। लातूर । वर्ष ३५ वे । अंक २८ वा । शनिवार, दिनांक ११ एप्रिल २०२६ । पृष्ठे ६ । किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# भुजबळ थोडक्यात बचावले

## पायलटने भलतीकडेच हेलिकॉप्टर उतरवले; अनर्थ टळला

**पुणे/प्रतिनिधी : अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांच्या संदर्भात एक मोठी माहिती समोर येत आहे. एका कार्यक्रमाला जात असताना छगन भुजबळ यांचे हेलिकॉप्टर भलत्याच ठिकाणी उतरल्याचे समजते. हेलिकॉप्टर लँड करताना पायलटकडून मोठी चूक झाल्याची माहिती आहे. यावेळी जरा इकडे तिकडे झाले असते, तर मोठा अनर्थ ओढवला असता, असे म्हटले जात आहे. या प्रकारातून छगन भुजबळ थोडक्यात बचावल्याचे सांगितले जात आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री हे महात्मा फुले जयंतीनिमित्त पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात असलेल्या खानवाडी या गावात आयोजित कार्यक्रमासाठी जात होते. हेलिकॉप्टरने छगन भुजबळ या कार्यक्रमाच्या ठिकाणी जात असताना लँडिंगदरम्यान मोठी चूक झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

### महत्त्वाच्या व्यक्तींनी प्रवास करताना काळजी घ्यायला हवी

छगन भुजबळ साहेब यांच्यासारख्या मोठ्या नेत्याचं हेलीकॉप्टर हेलिपॅडऐवजी अचानक एका पार्किंगमध्ये उतरवण्यात आल्याची बाब ही अतिशय गंभीर आहे. त्यामुळेच मी सातत्याने सांगतोय की, महत्त्वाच्या व्यक्तींनी प्रवास करताना काळजी घ्यायला हवी. अनेक विमानं आणि हेलिकॉप्टरर्समध्ये देखभालदुरुस्तीसह इतरही अनेक त्रुटी आहेत. आज सुदैवाने अपघात टळला पण म्हणून शासनानेही एवढा हलगर्जीपणा करणं योग्य नाही. विमान, हेलीकॉप्टर्सने प्रवास करताना सरकार यापुढे काळजी घेईल, ही अपेक्षा!, अशी पोस्ट आमदार रोहित पवार यांनी एक्सवर केली आहे. दरम्यान, मंत्री छगन भुजबळ सुरक्षित असून, त्यांनी आपला नियोजित कार्यक्रम पूर्ण केला. परंतु, प्रशासनाकडून आता या प्रकरणाची चौकशी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. हेलिपॅड स्पष्ट दिसत होते की नाही, पायलटकडून नेमकी चूक कशी झाली किंवा काही तांत्रिक अडचण होती का, याचा तपास केला जाणार असल्याचे म्हटले जात आहे.

नियोजित हेलिपॅडवर हेलिकॉप्टर उतरवण्याऐवजी पायलटने ते थेट कार पार्किंगच्या जागेत उतरवल्यामुळे काही काळ परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

या गावातील कार्यक्रमासाठी स्वतंत्र हेलिपॅडची व्यवस्था करण्यात आली होती. परंतु, हेलिकॉप्टरच्या पायलटला कार पार्किंगमधील मोकळी जागा हेच हेलिपॅड असल्याचे वाटले आणि त्या मोकळ्या जागेतच पायलटने हेलिकॉप्टर उतरवले. या अनपेक्षित प्रकारामुळे उपस्थितांमध्ये एकच खळबळ उडाली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. पार्किंगमध्ये काही वाहने उभी असली तरी कोणालाही गंभीर दुखापत झाल्याची नोंद नाही.

या ठिकाणी असलेल्या पोलिसांनी पायलटला योग्य माहिती दिल्यानंतर हेलिकॉप्टर तिथून हलवण्यात आले. या घटनेनंतर स्थानिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. योग्य नियोजन असतानाही चुकीच्या ठिकाणी हेलिकॉप्टर उतरवणे अत्यंत धोकादायक आहे. विशेषतः लोकवस्तीच्या जवळ अशा प्रकारची चूक मोठ्या अपघातास कारणीभूत ठरू शकली असती, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

## नांदेड व हिंगोली परिसरात भूकंपाचा धक्का

### हिंगोली जिल्ह्यातील मंदिर, सभागृहांना तडे, जिल्हाधिकाऱ्याच्या निवासालाही तडा



**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** नांदेड व हिंगोली जिल्ह्यास भूकंपाचा धक्का बसला असून रिश्चर स्केलवर त्याची तीव्रता ४.७ एवढी नोंदविण्यात आली असून त्याची खोली १० किलोमीटर एवढी असल्याचे सांगण्यात येत आहे. नांदेड शहरात हा धक्का ८.४५ बसला. नांदेड जिल्ह्यातील अनेक भागात हा भूकंपाचा धक्का जाणवल्याचे सांगण्यात आले. हिंगोली जिल्ह्यातील शिंदे पांगरा हे भूकंपाचे कंद्रस्थान असल्याचे सांगण्यात येत आहे.

हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, अनेक घरांना तडे गेल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. अगदी माझ्या घरालाही तडा गेला आहे. काही गावातील सार्वजनिक सभागृहांना तसेच मंदिरांना तडे गेले आहेत. संपूर्ण माहिती घेण्याचे काम सुरू आहे. आता फक्त प्राथमिक माहितीच हाती आली आहे. शिंदे पंगारा हे गाव केंद्रस्थानी आहे की नाही हेही अद्याप नक्की नाही. कारण केंद्र असेल त्या भागात नुकसान कमी असते. पण भूकंपाचा धक्का मोठा होता. हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यात नुकसान अधिक असू शकते असे सांगण्यात आले.

एमजीएम अंतराळ संशोधन केंद्राचे श्रीनिवास औंधकर म्हणाले, मराठवाड्यातील सर्वात मोठा भूकंप ६.४ रिश्चर स्केलचा होता. त्यानंतरचा हा भूकंप मोठा असल्याचे दिसून येत आहे. अनेक घरांना तडे गेले आहेत. भूकंप होताच अनेक घरावरचे पत्रे हलले. घरातून भांडीही खाली पडल्याचे सांगण्यात आले. अनेक घरांना तडे गेले आहेत. ' गेल्या महिन्यातही हिंगोली जिल्ह्यात भूकंपाचा धक्का बसला होता.

## बीएसएनएल कॉपर केबल चोरीचा प्रयत्न उधळला

### गांधी चौक पोलिसांची कारवाई; चार आरोपी ताब्यात

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील गुळमार्केट ते गांधी चौक या मुख्य मार्गावर भूमिगत बीएसएनएल कॉपर केबल चोरी करण्याचा प्रकार गांधी चौक पोलिसांनी उधळून लावला असून, या प्रकरणी चार आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे

याबाबत सविस्तर माहिती अशी की, दिनांक १० एप्रिल २०२६ रोजी मध्यरात्री ००.२० वाजण्याच्या सुमारास गुळमार्केट ते गांधी चौक जाणाऱ्या रस्त्यावर, एका हार्डवेअर दुकानासमोर, जमिनीतून गेलेल्या बीएसएनएलच्या कॉपर केबल वायर खोदून चोरी करण्याचा प्रयत्न करण्यात येत होता. सदरची माहिती गांधी चौक पोलिसांना प्राप्त झाली त्यावरून गांधी चौक पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी पोहचून कॉपर केबल चोरीचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींना ताब्यात घेतले आहे.

साईराम सुब्बाराव (वय २५ वर्षे, रा. एलुरु, जि. विजयवाडा, राज्य आंध्रप्रदेश) याच्यासह इतर तीन महिलांनी संगनमत करून आरोपींनी कोणतेही यांत्रिक साधन किंवा वाहन न वापरता हाताने खोदकाम करून केबल चोरी करण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले आहे.

फिर्यादी सुहास रामलिंग स्वामी (वय ४८ वर्षे, व्यवसाय - ज्युनियर टेलिकॉम ऑफिसर, BSNL, रा. सेंट्रल हनुमान, लातूर) यांनी पोलीस स्टेशन गांधी चौक येथे येऊन तक्रार दिल्यानंतर सदर प्रकरणी गु.र.नं. २०८/२०२६ कलम ३०३(२), ६२, ३(५) भारतीय न्याय संहिता (BNS) अंतर्गत गुन्हा दिनांक १०/०४/२०२६ रोजी पहाटे ०३.३२ वाजता दाखल करण्यात आला आहे. या घटनेत कोणताही माल चोरीला गेला नसून, पोलिसांच्या वेळेवर हस्तक्षेपामुळे मोठे आर्थिक नुकसान टळले आहे.पुढील तपास पोलीस हवालदार नराळे हे करीत आहेत.

संपूर्ण कारवाई पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड यांचे नेतृत्वात पोलिस अंमलदार राम गवारे, रविसन जाधव, सचिन चंद्रपाटले, नागनाथ नराळे यांनी केली आहे.

## प्रभात किरणे

ज्यांनी सृष्टी केली निर्माण सजीव प्राणी, भरला प्राण देणारा तो, कितीतरी श्रीमंत कैसे मागेल, भक्ताकडून दान

-इंजि. नागनाथ कलवले लातूर
९१-९७६४७ ८८२८८

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



पैसे नसतील तर लाडकी बहिण योजना बंद करा - कोर्ट

## चिमटा दयाचा



महामंडळाला 'बिलो टेंडर' चा फटका बसत आहे ! बसेसचे तिकीट वाढणार आहे !! अशामुळे एसटी महामंडळ तोट्यात दिसत आहे !!

## पाईपलाईन वाद शांततेत मिटवला

### पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर उपक्रमांतर्गत औराद पोलिसांची तत्पर कारवाई



**लातूर/प्रतिनिधी :** मौजे होसुर परिसरात दोन शेतकऱ्यांमध्ये पाईपलाईन टाकण्याच्या कारणावरून निर्माण झालेला वाद औराद पोलीस स्टेशनच्या तात्काळ व समंजस हस्तक्षेपामुळे शांततेत मिटविण्यात आला असून, दोन्ही पक्षांनी समाधान व्यक्त केले आहे. विशेष म्हणजे ही कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून जिल्हाभर राबविण्यात येत असलेल्या पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर या लोकाभिमुख उपक्रमाच्या अनुषंगाने करण्यात आली आहे.

याबाबत माहिती अशी की, मौजे होसुर येथील दोन शेतकऱ्यांमध्ये मौजे बोटकुळ येथील तळ्यातून आपल्या शेतासाठी पाणीपुरवठा करण्याकरिता पाईपलाईन रीतसर शासकीय परवानगी सह शेतातून नेण्याचा कारणावरून मागील सुमारे एक महिन्यापासून गावपातळीवर वाद सुरू होता व ग्रामस्थांच्या विरोधामुळे हे काम प्रलंबित ठेवण्यात आले होते. दरम्यान पाईपलाईनचे काम पुन्हा सुरू करण्यात आले असता सायंकाळी ८ वाजण्याच्या सुमारास दोन्ही शेतकऱ्यांमध्ये वाद तीव्र होऊन तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. घटनेची माहिती मिळताच औराद पोलीस स्टेशनचे प्रभारी सहायक पोलीस निरीक्षक हनुमंत बांगर यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी अत्यंत संयमाने दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेत, त्यांना कायदेशीर बाबींची जाणीव करून दिली व समजूत काढत वाद शांततेच्या मार्गाने मिटविण्यात यश मिळवले.

पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेणे, वादांचे वेळेत निवारण करणे व कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवणे हा आहे. सदर घटनेतही या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी दिसून आली.

पोलीसांच्या या तत्पर व संवेदनशील कारवाईमुळे संभाव्य कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न टळला असून, दोन्ही शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करत परस्पर सहमतीने प्रश्न सोडविण्याचा मार्ग स्वीकारला आहे.



